# परशुरामाने जोडलेला दुवा



त्रेतायुगापासून संपूर्ण भारत वर्षात एक आख्यायिका बनून राहिलेल्या भगवान परशुरामाने त्या काळात हिंदुस्थानभर संचार केल्याच्या खुणा सापडतात. आपल्या असामान्य पराक्रमाच्या जोरावर त्यानी दु:ष्ट आणि नराधम राजांचा नि:पात केला आणि धर्माचं राज्य स्थापन करण्यासाठी जिवाचं रान केलं.

परशुरामाने बाण मारून समुद्र मागे हटवला आणि कोकण प्रांताची निर्मिती केली असं म्हटलं जातं. भारतात समुद्रालगतच्या अनेक ठिकाणी हीच कथा सांगितली जाते. कोकण प्रांताला तर परशुराम भूमी म्हणूनच ओळखलं जातं. तिकडे देशाच्या पूर्वोत्तर राज्यातही परशुरामाच्या पराक्रमाच्या अनेक गोष्टी सांगितल्या जातात. मातृ आणि पितृ भक्त परशुराम तर जगविख्यात आहे. पित्याच्या आदेशाला शिरसावंद्य मानून त्याने स्वत:च्या आईचंच शिर धडावेगळं केलं आणि पुन्हा पिता प्रसन्न होताच आईसाठी जीवन मागून घेतलं. आईच्या हत्येचं हे पाप धुण्यासाठी त्याने ज्या कुंडात उडी टाकली त्या लोहित नदी मधल्या कुंडाला परशुराम कुंड म्हणून ओळखलं जातं. त्या काळापासूनच दर संक्रातीला या कुंडात स्नान करण्यासाठी हजारो श्रद्धाळू एकत्र येत असतात.

या वर्षीच्या मकरसंक्रातीच्या पवित्र स्नानाच्या वेळी पन्नास हजार भाविकांनी परशुराम कुंडाला भेट दिली. त्यापैकी तीस हजार यात्रेकरू भारताच्या विविध भागातून आले होते अशी माहिती लोहित जिल्ह्याच्या वाक्रो प्रांताचे अतिरिक्त सहाय्यक आयुक्त श्री. दाक्तो रिबा यांनी दिली आहे. यात्रेकरूंची

ही संख्या गतवर्षापेक्षा कमी आहे असंही रिबा म्हणाले. यात्रेकरूंची ही घटती संख्या प्रशासनालाही अपेक्षीत नव्हती.

आपल्या अरुणाचल प्रदेश राज्यातला लोहित जिल्हा निसर्गसंपदा आणि सौदर्याने भरलेला आहे. या जिल्ह्यातून वाहणाऱ्या लोहित नदीवरूनच या जिल्ह्याला लोहित हे नाव दिलं गेलं आहे. अनेक पौराणिक आणि ऐतिहासिक कथांशी जोडल्या गेलेल्या या ठिकाणी पर्यटनाला खूपच वाव आहे. शहरी प्रदुषणाचा मागमूस नसलेला हा प्रांत बर्फाच्छादित शिखरं, खळाळते जलप्रवाह, नद्या, सदाहरित जंगलाने परीपूर्ण असून पर्यटकांना सदोदित साद घालत आहे. इथली गावं, देश विदेशातील पर्यटकांच आकर्षण ठरू शकतील एवढी देखणी आहेत आणि त्यांनी आपली पारंपारिक नृत्य आणि कलांची जपणूकही केली आहे. पर्वतारोहण, राफ्टींग, जंगल सफारी आणि हत्तीवरून फेरफटका मारणं अशा पर्यटनाच्या अनेक संधी असूनही त्या दृष्टीने हा भाग अजून दुर्लक्षीत राहिला आहे. परशुरामकुंड हे अरुणाचल मधील तीर्थस्थळ, भालुकपॉग, दिरांग, बोमदीला, से ला पास, ही चीन-भारत युद्धभूमी, तळ्याचं तवांग या सर्वांचा इतिहास-भूगोलात असलेला उल्लेख एवढाच आपला असलेला संबंध असं न राहाता हिमालयाच्या कुशीत वसलेला अरुणाचल प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सह्याद्रीचा भाग असलेला कोकण प्रांत यांचं नातं परशुरामकुंड तसंच पर्यटनाच्या निमित्ताने घट्ट झालं तर विविधतेत असलेली एकात्मता या म्हणण्यालाही काही अर्थ प्राप्त होईल, नाही का?

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/